**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ०२/२०१० मधील</u>**
**<u>नि.क्र. ७० वरील आदेश</u>**
**श्री. सटुप्पा भावकू ओऊळकर, वगैरे वि. श्री. सुभाष सोमाणा गावडे, वगैरे.**

प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाई हुकूमाचा व हक्कज्ञापनेचा आहे. वादींनी वाद मिळकत ही त्यांच्या निरंतर वहिवाटीत असल्याचे हक्कज्ञापन मागितले असून याशिवाय वादींनी इतर विविध शिर्षकाखाली निरंतर मनाई हुकूमाचे दाद मागितले आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम १, नियम १०(२) अन्वये, नि.क्र. ७० वर दाखल केलेल्या या अर्जाद्वारे वादी हे अर्ज परिच्छेद क्र. ७ मध्ये नमुद एकूण २ व्यक्तींना प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ४ व ५ म्हणून सामिल करण्याची विनंती करत आहेत. अर्जात वादी कथन करतात की, वाद मिळकतीच्या पश्चिमेस नगर भूमापन क्रमांक ११९ ते १२१ या मिळकती श्री. सुरेश नारायण ओऊळकर व जोतिबा विष्णू ओऊळकर या इसमांच्या आहेत. वाद मिळकतीची हद्द निश्चित करण्यासाठी व वादाच्या संपूर्ण निराकरणासाठी सदर दोन्ही इसमांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार म्हणून सामिल करणे आवश्यक आहे. सबब, त्यांनी या कारणास्तव उपरोक्त अनुतोष मागितलेला आहे. अर्जास वादी क्र. १ चे शपथपत्र जोडले आहे.

२. नि.क्र. ७१ वर सादर केलेल्या लिखित हरकतीद्वारे प्रतिवादींनी वादींच्या अर्जास आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादी यांनी या हरकत पत्रात त्यांच्या कैफियतीतील कथनांचा संक्षिप्तपणे पुनुरुच्चार करुन अर्ज निरसीत करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी कथन करतात की, नगर भूमापन क्र. ११९ ते १२४ या मिळकतींची मोजणी व चौकशी यापूर्वीच झाली असून त्यातील निर्णय वादींनी योग्य त्या सक्षम न्यायपिठासमोर आव्हानित न केल्याने त्या मोजणीस अंतिम स्वरुप प्राप्त झाले आहे. तसेच, वादी कथन करतात त्यानुसार नगर भूमापन क्र. ११९ ते १२१ या मिळकती वाद मिळकतीस लगत नाहीत. प्रस्तावित पक्षकारांचा वाद मिळकतीशी कोणताच संबंध नसल्याने त्यांना प्रस्तुत प्रकरणात पक्षकार म्हणून सामिल करणे मुळीच आवश्यक नाही. अन्य मार्गाने पुरावा संकलित करण्यासाठी व प्रतिवादींना निष्कारण त्रास देण्यासाठी वादींनी प्रस्तुत अर्ज

सादर केला असून तो फेटाळण्याची त्यांनी विनंती केली आहे.

३. वादींतर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. आर.पी. बांदिवडेकर यांचा व प्रतिवादींतर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. एल.व्ही. भातकांडे यांचा युक्तिवाद ऐकला.

४. वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रस्तुत दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम १, नियम १०(२) अन्वये अन्वये दाखल केला असल्याने वादींनी प्रस्तावित केलेल्या इसमांना प्रस्तुत प्रकरणात पक्षकार म्हणून सामिल करणे वादाच्या योग्य निर्णयासाठी व वादातील प्रश्नांचे उकल करण्यासाठी आवश्यकता आहे किंवा कसे हे पाहणे क्रमप्राप्त आहे. उपरोक्त नमुद केल्यानुसार प्रस्तुतचा दावा हा वाद मिळकतीतील वहिवाटीच्या अधिकाराबाबत हक्कज्ञापनेसाठी व निरंतर मनाई हुकूमासाठी सादर असल्याने केवळ मोजणी करण्यास सुलभता येण्यासाठी म्हणून लगतच्या मिळकत धारकांना वादात सामिल करणे गरजेचे आहे हे वादीचे कथन कायदेशीर नाही. निश्चितच, दाव्यात मागणी केलेल्या अनुतोषाच्या पार्श्वभूमीवर वाद मिळकतीची मोजणी करवून घेणे व मोजणीअंती स्पष्ट होणारी परिस्थिती न्यायालयासमोर येणे जरी आवश्यक असले तरी, मोजणी करुन घेण्याचे व ती परिस्थिती न्यायालयासमोर आणण्याचे कायदेशीर दायित्व वादींचे आहे. यास्तव, वादींना उपरोक्त कारणासाठी लगतच्या सर्व मिळकत धारकांना प्रस्तुत प्रकरणात पक्षकार म्हणून सामिल करुन घेण्याची मागणी रास्त नाही. प्रस्तुत दावा व दाव्यातील सध्यस्थिती पाहता, या घडीस वादींना प्रस्तावित इसमांना पक्षकार म्हणून सामिल करण्यास अनुमती दिली तर त्यायोगे दाव्याच्या चौकशीची प्रगती ही पुन्हा मागे जाईल व तो शून्य बिंदूवर पोहोचेल. असे झाल्यास, त्यायोगे प्रतिवादींचेच नव्हे तर वादींची सुध्दा हाणी संभवते. अर्जातील मागणीचे स्वरुप व त्याची योग्यता तपासून पाहता प्रस्तावित इसमांची दाव्यात पक्षकार म्हणून मुळीच आवश्यकता नाही. वादी हे दाव्यात प्रभुत्ववादी असले तरी त्यांना त्यांच्या इच्छेनुसार हव्या त्या घडामोडी दाव्यात घडविता येणार नाहीत. असे होत असल्यास, न्यायालयास सजगतेने त्याकडे पाहावे लागेल. अशा परिस्थितीत, अर्ज निरसीत होण्यास पात्र आहे. परिणामतः, निम्न आदेश.

## आ दे श

नि.क्र. ७० वरील अर्ज निरसीत करण्यात येत आहे.

खर्चाबाबत आदेश नाही.

DISTRICT COURT, MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Amrit Chandrakant Birajdar
Date: 2020.03.12 15:53:58 +0530

दि.१२/०३/२०२० **(अमृत चं. बिराजदार)**
चंदगड दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चंदगड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. V.G. Kamble, L. G. Stenographer. |
| Name of Court | Shri. A. C. Birajdar,<br>Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Chandgad. |
| Date of Dictation | 12/03/2020 |
| order signed by the P. O. on | 12/03/2020 |
| order uploaded on | 14/05/2020 |